**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक २८ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **सीबीएसईच्या बारावीच्या पूर्ण परीक्षेचं पुनर्मूल्यांकन करण्याची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांची घोषणा.**
2. **नागपूरसह राज्यभरात बकरी ईदचा सण उत्साहात साजरा.**
3. **येत्या 31 मे ते 7 जून दरम्यान नागपुरात खासदार क्रीडा महोत्सवाचं आयोजन.**
4. **वर्धा इथं सर्वाधिक 45 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद.**

-----------------------------------------

सीबीएसई

सीबीएसईच्या बारावीच्या परीक्षेच्या मूल्यमापन प्रक्रियेबाबत काही त्रुटी निदर्शनाला आल्यामुळे आता पुनर्मूल्यांकन प्रक्रिया सुरू केली जाईल, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत सीबीएसईच्या अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलत होते. सर्व विद्यार्थ्यांच्या शंकांचं निरसन केलं जाईल. तसंच मूल्यमापनातल्या विसंगती संदर्भातल्या समस्यांचं निराकरण केलं जाईल आणि त्यावर उपाययोजनाही केल्या जातील, असं प्रधान यावेळी म्हणाले.

-----------------------------------------

ईद-उल-अजहा

देशभरात आज ईद उल- अजहा-अर्थात बकरी ईद भक्तिभावानं साजरी होत आहे. यानिमित्त विशेष नमाज आणि प्रवचनांचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईद उल अजहा निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. ईद निमित्त नागपुरातील मोमीनपुरा इथल्या जामा मस्जिद इथं विशेष नमाजचं आयोजन करण्यात आलं होतं. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी मुस्लिम बांधवांना इस्लामच्या हिशेबानं कुर्बानी करा, आपल्या कुर्बानीनं

कुठल्या दुसऱ्या व्यक्तीला त्रास होऊ नये, असा संदेश दिला आहे. प्रशासनानं जे नियम-कायदे बनविले आहेत, त्या कायद्याअंतर्गत कुर्बानी करा, असं आवाहन केलं आहे. वाशिमसह विदर्भात ठिकठिकाणी ईदचा उत्सव बघायला मिळाला.

----------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्यातल्या अनेक प्रश्नांवर त्यांनी पंतप्रधानांशी चर्चा केली, तसंच राज्यातल्या अनेक प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीची माहिती दिली. राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असं मुख्यमंत्र्यांनी काल केंद्रीय जलसिंचन मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर सांगितलं. राज्यातल्या ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पूर्ण झालेल्या योजना, तसंच ५० ते ७५ टक्के दरम्यान पूर्ण झालेल्या योजनांना प्राधान्यानं निधी दिला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

----------------------------------------

स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. सावरकर यांचं शौर्य आणि राष्ट्रभक्ती कायम लोकांना प्रेरणा देत राहील, तसंच त्यांची बुद्धिमत्ता आणि समाजसुधारणेवरील त्यांचा भर हे देखील विशेष उल्लेखनीय असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावरकरांना आदरांजली वाहताना म्हटलं आहे. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज मुंबईत लोकभवन इथं सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं.आजपासून नागपूरच्या लक्ष्मी नगर इथल्या वॉलीबॉल ग्राउंड इथं स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर आधारित ३ दिवसीय व्याख्यानमालेचं आयोजन करण्यात आलं आहे. 'स्वातंत्र्यवीर सावरकर जाणून घेतांना' या विषयावर विवेक घळसासी व्याख्यान देतील.

----------------------------------------

तांदूळ उत्पादन

तांदूळ उत्पादनात चीनला मागं टाकून भारत सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश ठरल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत खरीप अभियान 2026 या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभाला संबोधित करत होते. यंदा देशातलं अन्नधान्याचं

अंदाजित उत्पादन ३७ कोटी ६० लाख टनांपेक्षा जास्त असून हा आकडा गेल्या वर्षीच्या तुलनेत ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांनी जास्त असल्याचं चौहान यावेळी म्हणाले.दोन दिवस होणाऱ्या या परिषदेत कृषी आणि संबंधित विषयावर व्यापक चर्चा होणार असून, राज्यांमधील भागीदारी आणि हवामान बदलाच्या आव्हानाच्या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामासाठी धोरणात्मक कृती आराखडा तयार करणं हा या परिषदेमागचा उद्देश आहे.

---------------------------------------

वन्यजीव तस्करी

महसूल गुप्तचर संचालनालयाच्या नागपूर विभागीय पथकानं म्हैसूर इथं अवैध वन्यजीव तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत भारतीय हत्तींच्या सुळ्यांचा म्हणजेच हस्तिदंतांचा अवैध व्यापार करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. आरोपींकडून सुमारे चार किलो वजनाचे हस्तिदंत जप्त करण्यात आले.

---------------------------------------

सीयूईटीयूजी

बकरी ईदमुळे आज नियोजित असलेल्या पदवीपूर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या सी यू ई टी यूजी अर्थात सर्वसाधारण विद्यापीठ प्रवेश परीक्षा सुधारित वेळापत्रकानुसार आता ३१ मे, ६ आणि ७ जून रोजी घेण्यात येतील. ३१ मे रोजी होणाऱ्या परीक्षेसाठीची प्रवेशपत्रं प्रसिद्ध करण्यात आली असून ती cuet.nta.nic.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. उर्वरित परीक्षांसाठीची प्रवेशपत्रं लवकरच प्रसिद्ध केली जातील.

---------------------------------------

संयुक्त पूर्व परीक्षा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतली जाणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ आणि गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा येत्या रविवारी होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.

---------------------------------------

प्रवीण पोटे पाटील

भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे हे उद्या अमरावती दौऱ्यावर येणार असून विधान परिषद निवडणुकीसाठी भाजप उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्या उमेदवारी अर्ज दाखल कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी बावनकुळे प्रवीण

पोटे पाटील यांना भाजपचा अधिकृत 'बी फॉर्म' सुपूर्त करणार असल्याची माहिती पक्ष सूत्रांनी दिली. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक होणार असून त्यानंतर मोठी रॅली जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना होणार आहे.

----------------------------------------

खासदार क्रीडा महोत्सव

नागपुरात खासदार क्रीडा महोत्सवाचं आयोजन येत्या 31 मे ते 7 जून दरम्यान शहरातील 20 ठिकाणी होणार असून महोत्सवाचं उद्‌घाटन रविवार दि. 31 मे रविवार रोजी सकाळी साडे पाच वाजता यशवंत स्टेडियम धंतोली इथं सिने अभिनेते सुनील शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती आज केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या क्रीडा महोत्सवा दरम्यान कुस्ती, खो-खो, बॅडमिंटन, एथलेटिक्स, कबड्डी, बास्केटबॉल, बुद्‌धिबळ, कॅरम, वॉलीबॉल, योग, जिमनास्टिक, स्केटिंग, टेबल टेनिस आणि सॉफ्ट बॉल यांसह 18 खेळांचा समावेश करण्यात आला असून महोत्सवाची सुरुवात 31 मे रोजी पहाटे 5 वाजता मॅरेथॉन दौड स्पर्धेनं होणार आहे. या आठ दिवसीय महोत्सवादरम्यान एकूण २३ हजार ८०० खेळाडू सहभागी होणार असून 571 चषकं, 6 हजार 700 पदकं आणि सुमारे 57 लाख रुपये बक्षिसांचं वितरण होणार आहे. या पत्रकार परिषदे दरम्यान केंद्रीय नागरी उड्डयण राज्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ सुद्‌धा उपस्थित होते.

----------------------------------------

रामदास आठवले

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी महायुतीत रिपाईला अपेक्षित महत्त्व मिळत नसल्याची नाराजी व्यक्त केली. भाजप-शिवसेना युतीच्या काळात रिपाईचं स्थान अधिक प्रभावी होतं, मात्र आता महायुतीत पक्ष दुर्लक्षित होत असल्याचं त्यांनी यवतमाळ इथं माध्यमांशी बोलताना सांगितलं. रिपाईला सत्तेत प्रतिनिधित्व मिळावं, एखादं मंत्रिपद किंवा विधान परिषदेत संधी द्‌यावी, अशी मागणी त्यांनी केली. तसंच पक्ष संघटनात्मकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी विधानसभा निवडणुकांची तयारी करावी, असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं.

----------------------------------------

'मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या रविवारी सकाळी ११ वाजता 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असून त्याचं थेट प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, एआयआर न्यूज या संकेतस्थळावर आणि न्यूज ऑन एअर मोबाईल ॲपवर केलं जाणार आहे. त्याचप्रमाणे AIR न्यूज, डीडी न्यूज तसंच प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरून हा कार्यक्रम थेट प्रक्षेपित होईल.

-----------------------------------------

श्वेता महाले

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ बुलढाणा जिल्ह्यातील चिखली इथं भाजपकडून आंदोलन करण्यात आलं. आमदार श्वेता महाले यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या या आंदोलनात जोरदार घोषणाबाजी करत महाले यांनी काँग्रेसवर टीका केली.

-----------------------------------------

हवामान

विदर्भात उन्हाचा पारा प्रचंड वाढला आहे, त्यामुळे आता पर्यावरणाकडे लक्ष दिलं पाहिजे. उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी काहीतरी योजना यायला पाहिजे. तापमानावर अभ्यास करण्यासाठी एखादी समिती सरकारनं नेमावी, अशी मागणी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यवतमाळमध्ये पत्रकारांशी बोलतांना केली. विदर्भामध्ये आज वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला असून अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. आगामी काही तासात यवतमाळ, अमरावती आणि वर्धा तसंच चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, बुलढाणा, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेच्या यलो अलर्ट सोबतच वादळी पर्जन्यमान राहू शकतं. उद्या वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट देण्यात आला असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं. एक जूनपर्यंत संपूर्ण विदर्भात अधून-मधून विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. आज दुपारी अडीच वाजता नोंदवलेल्या तापमानानुसार वर्धा इथं सर्वाधिक 45 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या

कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. गोंदिया इथं 45, गडचिरोली इथं 44.6, अमरावती इथं 44.4, अकोला इथं 44, नागपूर इथं 41.4, तर बुलढाणा इथं 39 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

-----------------------------------------